**ठळक बातम्या**

- फ्रान्स दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अमेरिकेला रवाना
- मोबाइलवर येणारे अनावश्यक कॉल किंवा SMS ची तक्रार करायला ग्राहकांना आता आठवडाभराची मुभा
- बांगलादेशमध्ये गेल्यावर्षी झालेल्या विद्यार्थी आंदोलनात मानवी अधिकारांचं उल्लंघन करण्यात सरकार, लष्कर आणि गुप्तचर यंत्रणा तसंच अवामी लीगचा हात असल्याचा संयुक्त राष्ट्राच्या समितीचा अहवाल
- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पदक तालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर कायम

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं दिलेल्या ३५७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची फलंदाजी ढेपाळली

**<><><><><>**

फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अमेरिकेला रवाना झाले. त्यापूर्वी फ्रान्समधे मार्सेली इथं भारताच्या पहिल्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन आज प्रधानमंत्री आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्या हस्ते झालं. उभय नेत्यांनी यावेळी फ्रान्समधे राहणाऱ्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. त्यानंतर मझार्गे युद्धस्मारकावर दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या सतराशे भारतीय सैनिकांना त्यांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी भारत-फ्रान्स संयुक्त प्रकल्प आंतरराष्ट्रीय प्रायोगिक औष्णिक अणुभट्टीला तसंच मार्सेली बंदराला भेट दिली. मार्सेली हे फ्रान्समधलं सर्वात मोठं बंदर असून युरोप, आफ्रिका आणि आशिया दरम्यानच्या सागरी व्यापाराचं ते प्रवेशद्वार मानलं जातं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांनी उभय देशांदरम्यानच्या भागीदारीविषयी सविस्तर चर्चा केली. संरक्षण, अणुशक्तीचा शांतिपूर्ण वापर, तसंच अंतराळविज्ञान या विषयांचा त्यात समावेश होता, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. आपसातल्या तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनं पुढचं वर्ष भारत फ्रान्स नवोन्मेष वर्ष म्हणून साजरं करण्यावर दोघांमधे सहमती झाली असल्याचं मिसरी यांनी सांगितलं. युरोप, पश्चिम आशिया आणि हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रातल्या भूराजकीय घडामोडींविषयी देखील त्यांच्यात चर्चा झाली. मोदी आणि मॅक्राँ एकाच विमानाने मार्सेली इथं गेले, त्या प्रवासातही दोघांमधे बातचीत झाली. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर प्राधान्याने त्यांचं बोलणं झालं.

**<><><><>**

राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी मोफत वस्तू द्यायच्या घोषणा करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली. मोफत वस्तूंची सवय लागली तर लोक काम करणार नाहीत,असं न्यायालयाने म्हटलं आहे. नागरी भागात बेघर लोकांच्या निवाऱ्याच्या हक्का संदर्भात न्यायमूर्ती बी आर गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. निवारा देण्याचा हेतू चांगला आहे, मात्र त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणं जास्त योग्य होणार नाही का, असा प्रश्न न्यायालयाने सरकारला यावेळी विचारला.

**<><><><>**

मोबाइलवर येणारे अनावश्यक कॉल किंवा SMS ची तक्रार ग्राहकांना आता ३ दिवसाऐवजी ७ दिवसापर्यंत करता येणार आहे. ग्राहकानं कॉल किंवा SMS

पाठवणारा क्रमांक, याविषयी थोडक्यात माहिती, तारिख यासारखी माहिती दिली तर मोबाइल कंपन्यांना ही तक्रार ग्राह्य धरावी लागेल. आवश्यकता असेल तर या कंपन्यांनी ग्राहकांना अधिक माहिती विचारावी, असं ट्रायनं स्पष्ट केलंय. तक्रार करण्याची सुविधा मोबाइल ॲप किंवा वेबसाइटवर ठळक पणे दाखवणे कंपन्यांना बंधनकारक असेल. या तक्रारीवर कंपन्यांना आता ३० ऐवजी ५ दिवसात कारवाई करावी लागेल. रोबोमार्फत होणारे कॉल किंवा आपोपाप केल्या जाणाऱ्या कॉलची माहिती ग्राहकांना देणंही आता बंधनकारक केलंय. त्यामुळं ग्राहकांना होणारा व्यत्यय कमी होईल.

१० आकडी क्रमांकावरुन कंपन्यांना ग्राहकांना मार्केटिंग कॉल करता येणार नाही. त्यासाठी १४० या क्रमांकानं सुरू होणाऱ्या नंबरचाच वापर करावा लागेल. याशिवाय विविध व्यवहार किंवा सेवा पुरवण्यासाठी १६०० या क्रमाकांनं सुरू होणाऱ्या नंबरचा वापर करावा लागेल. वारंवार अनावश्यक कॉल करणाऱ्या क्रमांक सुरुवातीला १५ दिवसांसाठी बंद करावा लागेल. त्यानंतरही अनावश्यक कॉल सुरू राहिले तर वर्षभरासाठी ही बंदी लागू होईल. ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी लागेल. अनावश्यक कॉलची चुकीची आकडेवारी देणाऱ्या कंपन्यांना २ ते ५ लाख रुपये दंड आकारण्याचा इशाराही ट्रायनं दिला आहे.

**<><><><><>**

खाद्यपदार्थांच्या किमती घसरल्याने जानेवारी महिन्यात किरकोळ चलनफुगवट्याचा दर ४ पूर्णांक ३१ शतांशावर आला. केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने आज ही आकडेवारी प्रसिद्ध केली. गेल्या ५ महिन्यातला हा नीचांक आहे. गेल्या वर्षीच्या जानेवारीत हा दर ५ पूर्णांक एक दशांश टक्के होता.

**<><><><><>**

प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री दीपिका पदुकोण यांनी आज विद्यार्थ्यांना अपयशाच्या भीतीची चिंता न करता त्यांच्या ताकदीवर लक्ष केंद्रित करण्याचे आणि त्यांच्या कमकुवतपणावर मात करण्याचे आवाहन केलं. "परीक्षा पे चर्चा - २०२५" या कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात पदुकोण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत होत्या.

**<><><><>**

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे पुत्र अविजीत मुखर्जी आज काँग्रेसमधे परतले. पश्चिम बंगालमधल्या जांगीपूर लोकसभा मतदारसंघातून २०१२ च्या पोटनिवडणुकीत तसंच २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते निवडून आले होते. २०१९ च्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर २०२१ मधे त्यांनी तृणमूल काँग्रेसमधे प्रवेश केला होता. ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी आज काँग्रेसमधे प्रवेश केला.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेनं कोटक महिंद्रा बँकेवर गेल्यावर्षी लादलेले निर्बंध हटवले आहेत. नवीन ग्राहक स्वीकारणे, नवे क्रेडिट कार्ड देणे यासारख्या गोष्टींवर हे निर्बंध होते. मात्र सर्व नियामकीय पूर्तता पूर्ण केल्यामुळे आणि आवश्यक उपाययोजना केल्यानं रिझर्व्ह बँकेनं हे निर्बंध हटवले.

**<><><><>**

वस्तु आणि सेवाकर गुप्तचर महासंचालनालयानं १ हजार १९६ कोटी रुपयांचा इनपूट टॅक्स क्रेडिट घोटाळा खणून काढत बोगस कं◌्पन्यांचं एक जाळं उघडकीला आणलं आहे. याप्रकरणी एक व्यक्तीला अटक केली आहे. या महासंचालनालयाच्या पुणे विभागानं पुणे, दिल्ली, नोएडा आणि मुजफ्फरनगर इथं अनेक ठिकाणी शोधमोहिम राबवली.

**<><><><>**

बांगलादेशामध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान उसळलेल्या हिंसाचारात तत्कालीन सरकार, सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणा, अवामी लीग पार्टीचे सदस्य यांचा सहभाग असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार कार्यालयाच्या तपासात निष्पन्न झालं आहे. मात्र, बांगलादेशातल्या कुठल्याही राजकीय पक्षावर बंदी घालू नये, असं केलं तर बहुपक्षीय लोकशाहीच्या व्यवस्थेला तडा जाऊ शकतो असं  असंही संयुक्त राष्ट्रांनी सांगितलं आहे.

उच्च न्यायालयाच्या सार्वजनिक सेवेतल्या नोकऱ्यांमध्ये कोटा प्रणाली पुन्हा लागू करण्याच्या निर्णयामुळे हे आंदोलन सुरू झालं होतं. बांगलादेशाच्या तत्कालीन सरकारने सत्तेत टिकून राहण्यासाठी या आंदोलनाला हिंसक मार्गाने दडपण्याचा प्रयत्न केल्याचंही या तपासात आढळलं आहे.

**<><><><><>**

टाटा स्मारक केंद्र आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बायोमेडिकल जीनोमिक्स यांनी, स्तनाच्या कर्करोगाच्या काही रुग्णांकडून हार्मोन उपचारांना प्रतिसाद न मिळण्यामागची जनुकीय कारणं शोधून काढली आहेत. या शोधामुळे अशा रुग्णांसाठीची उपचार योजना ठरवण्यात मदत मिळणार आहे. या शोधात, हार्मोन उपचारांना प्रतिसाद देणाऱ्या आणि प्रतिसाद न देणाऱ्या रुग्णांच्या जीनोमचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर ट्यूमरमधल्या तीन प्रमुख जनुकांमध्ये उत्परिवर्तन आढळलं. हा शोध म्हणजे कर्करोगाच्या वैयक्तिकृत उपचारांमधलं एक महत्त्वाचं मार्गदर्शक पाऊल आहे, असं प्रमुख संशोधक डॉ. निधान बिस्वास यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पदक तालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर कायम आहे. महाराष्ट्राकडे सध्या सर्वाधिक

१६७ पदकं असून यात ४७ सुवर्ण, ६० रौप्य आणि ६० कांस्य पदकांचा समावेश आहे. सेना दलं या पदकतालिकेत ५९ सुवर्ण पदकांसह पहिल्या स्थानावर तर ३४ सुवर्णपदकांसह कर्नाटक दुसऱ्या स्थानावर आहे.

४०० मीटर अडथळा शर्यतीत महाराष्ट्राच्या नेहा धाबळे हिने १ मिनीट ५२ मिनीसेकंद इतकी वेळ नोंदवत कांस्यपदक पटकावलं. महिलांच्या ५ हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्राच्या संजीवनी जाधव हिने १५ मिनिटं ५९ सेकंद १२ मिनीसेकंद इतकी वेळ नोंदवत रौप्य पदक जिंकलं, तर तिची सहकारी पूनम सोनु हिने या शर्यतीत कास्य पदक जिंकलं. मिश्र रिले स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने रौप्य पदक पटकावलं. शामराव दौंडकर, मानसी भारेकर, निखील ढाके आणि ऐश्वर्या मिश्रा यांनी ही स्पर्धा ३ मिनिटं २५ सेकंद ३५ मिनीसेकंद इतकी वेळ नोंदवली.

**<><><><><>**

इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय क्रिकेट मालिका भारत ३-० अशी जिंकणार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताच्या ३५६ धावांचा पाठलाग करताना शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या ३२ व्या षटकात ८ बाद १८७ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//